MAHARASHTRA STATE COUNCIL
FOR OCCUPATIONAL THERAPY & PHYSIOTHERAPY, MUMBAI
महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई
St. George's Hospital, Behind C.S.T. Station, Ph. 22620408 Mobil No.9224586392

जा.क्र.ओटीपीटी/परिषद/तपासणी/नोंदणी/०९, दिनांक: ३० ऑक्टोबर २०१०

प्रति,

__________

__________

__________

**विषय:** व्यवसायोपचार व भौतिकोपचार महाविद्यालयाची तसेच पदवीधारकाची परिषदेकडे नोंदणी करणेबाबत....

महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद संदर्भाधिन अधिनियमान्वये अस्तित्वात आलेली असुन परिषदेचे कार्यालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय चौथ्या मजल्यावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यान्वित झालेले आहे. परिषदेच्या अधिनियमात तरतुद केल्याप्रमाणे

१) व्यवसायोपचार शास्त्र व भौतिकोपचार शास्त्र विषयातील पदविका अथवा पदवी ज्या विद्यापीठ/ अभिमत विद्यापीठ/संस्थेतुन प्राप्त झालेली असेल ते महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेकडून मान्यताप्राप्त असणे बंधनकारक आहे.

२) महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यापीठाकडुन पदविका अथवा पदवीधारकांना व महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या तज्ञांना समकक्ष समितीचे प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेकडून घेणे आवश्यक आहे.

३) शासकीय राजपत्र भाग ८ मध्ये प्रकाशित केलेल्या महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्था, व्यतिरीक्त इतर सर्व शैक्षणिक संस्थांना महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेकडे नोंदणी बंधनकारक आहे.

४) कार्यरत शैक्षणिक संस्थांना महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेकडून नोंदणी व पुढे मान्यता चालू ठेवण्याकरीता प्रत्येक पाच वर्षानी निरीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे.

५) व्यवसायोपचार शास्त्र व भौतिकोपचार शास्त्र विषयातील पदविका अथवा पदवी अभ्यासक्रमासाठी नव्याने सुरु होणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी प्रथम तुकडीचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत प्रत्येक शैक्षणिक वर्षी महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेकडून निरिक्षण करुन घेणे बंधनकारक आहे.

६) संस्था नोंदणी शुल्क

| | |
|---|---|
| निरीक्षण | रु. ४०,००० |
| स्नातक | रु. ५०,००० |
| स्नातकोत्तर | रु. ७५,००० |

७) ज्या संस्थेला महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेकडुन कायमस्वरुपी मान्यता देण्यापुर्वी जर संस्थेत त्रृटी आढळुन आल्यास या परिषदेकडुन (संबधित निरीक्षण समितीच्या अहवालानुसार) तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देवुन त्रृटीची पूर्तता एक वर्षाच्या आत पुर्ण करणे बंधनकारक आहे अन्यथा संस्थेची नोंदणी तात्पुरती रद्द करण्यात येईल.

**८) परिषदेकडे नोंदणी करण्या प्रयोजनार्थ मुद्दा क्रमांक ६ मध्ये दर्शविण्यात आलेले शुल्क लवकरात लवकर भरुन नोंदणी करावी.**

९) परिषदेकडे नोंदणी करण्यासाठी अधिनियमान्वये आवश्यक असलेली कागदपत्रे व नोंदणी शुल्क धनाकर्ष स्वरुपात पाठविण्यात यावा. त्या कागदपत्राची छाननी केल्यानंतर "नोंदणी अर्ज"पाठविण्यात येईल.

प्रबंधक,
(डॉ.ए.के.झाडे),
महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद.